महामंडलेश्वर

**स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे**

**सत्संग - प्रवचन**

# संत संगतीने मुक्ती



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दुरध्वनी :

किंमत : दहा रुपये ( १०/-)

# निवेदन

आजच्या कलियुगामध्येच नव्हे तर प्रत्येक युगामध्ये जीवनात संत संगतीचे अत्यंत महत्त्व आहे जीवन जर महान बनवायचे असेल तर त्यासाठी दुर्जनाची संगती टाळली पाहिजे व संतांची, सज्जनांची, सत्पुरुषांची, साधूपुरुषांची संगती धरली पाहिजे.

संत संगतीचा चांगल्याच्या संगतीचा महिमा केवळ मोठ्यानाच कळाला पाहिजे असे नव्हे, तर बालकांना, तरुणांना व वृद्धांना देखील कळाला पाहिजे. कारण संगतीने कोणी महान तर कोणी लहान होतो म्हणजेच कोणी उंच गतिला तर कोणी निच गतीला जातो म्हणून सद्‌गतीचे, दुर्गतीचे कारण संगती आहे.

समाजाला संतांची संगती मिळाली तर समाज चांगला होतो असा आजपर्यंतचा इतिहास आहे. म्हणून अनुष्ठान काळामध्येच नव्हे तर अन्य वेळेस देखील स्वामीजी (बाबाजी) संत संगतीचा परिणाम व महिमा सांगत असतात कारण संताच्या संगतीने मोक्ष व दुर्जनाच्या संगतीने बंध किंवा नर्क प्राप्त होतो.

आपणास संताची संगती प्राप्त होऊन आपली मुक्ती व्हावी या भावनेने संताचा महिमा, संतांची लक्षणे ज्या प्रवचनात सांगितलेले आहे असे प्रवचन संग्रहीत करून पुस्तक रूपाने आपल्या हातात देतांना आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

प्रकाशक



**संतावाचोनिया सुख कोठे नाही ।अमृत त्यांचे पायी नित्य वसे ।।१।।**
**संताचे संगती होय मोक्ष प्राप्ती ।नको पा संगती दुर्जनाची ।।२।।**
**दुर्जनाच्या संगे दुःख प्राप्त होय । तेथे कैसी सोय तरावया ।।३।।**
**एका जनार्दनी हेचि सत्य वाचा । नको अभक्ताचा संग देवा ।।४।।**

◆ ◆ ◆

या संसार सागरामध्ये सुख समाधान शांतता मोक्ष प्राप्त करायचा असेल, परमगती मिळवायची असेल तर त्या साठी काय करायला पाहिजे? या अभंगाचा उच्चार करण्यापूर्वी, सत्संग - प्रवचन सुरू करण्यापूर्वी एक संत वचन या ठिकाणी आपणास सांगितले होते की,

**स्वर्ग मृत्यू पाताल में पूर तीन सुख नही ।**
**सुख ईश्वर के भजन में और संतन के माही ।।**

जर आपणास शाश्वत सुख, स्वावलंबी सुख, निर्विकारी सुख प्राप्त करायचे असेल तर असे सुख स्वर्ग, मृत्यू, पाताळात नाही असे सुख केवळ ईश्वराच्या भजनामध्ये आणि संताच्या सानिध्यात आहे. हे संत वचन ऐकल्यानंतर काहीच्या मनांमध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, आम्हाला सुख प्राप्त करायचे आहे. तर आम्ही ईश्वराचे भजन करायला पाहिजे की, संताच्या सानिध्यात राहिले पाहिजे. या प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी संत एकनाथ महाराजांचा हा अभंग ध्यान पूर्वक ऐकला पाहिजे आणि त्याचे मनन, चिंतन केले पाहिजे. कारण की संत एकनाथ महाराजांनी इतर संताप्रमाणे हा अभंग शास्त्रप्रचिती, गुरुप्रचिती आणि आत्मप्रचितीने लिहीलेला आहे.

आपणास संत एकनाथ महाराजांचे जीवन चरित्र माहीत असेल की पाच वर्षाचे असताना संत एकनाथ महाराजांनी घरादाराचा

त्याग केला. त्यानंतर देवगिरी किंवा ज्याला दौलताबादचा किल्ला म्हणतात अशा त्या किल्यावरती राहणाऱ्या संत जनार्दन स्वामी महाराजांच्या सानिध्यात ते आले. त्याची सेवा केली तिथे ते त्यांच्या सानिध्यात बरेच काळ राहिले. नंतर त्यानी गृहस्थाश्रम स्वीकारला त्याच्या गृहस्थाश्रमामध्ये स्वतः भगवंत श्रीखंड्या नावाने नौकराच्या रुपाने राहिले. त्यांची प्रसिद्धी बघून काही दुष्टानी त्यांचा छळ देखील केला. म्हणजेच एकनाथ महाराज दुष्टाच्या सानिध्यात गेले नाही तर दुष्टच त्यांचा छळ करण्यासाठी त्यांच्या सानिध्यात आले. तात्पर्य हे की ज्या संत एकनाथ महाराजांना संताचे, भगवंताचे आणि दुष्टाचे सानिध्य प्राप्त झाले. त्या सर्वाचा अनुभव घेऊन ते या अभंगाच्या पहिल्या चरणामध्ये म्हणतात का...

**संता वाचूनिया सुख कोठे नाही ।**

संताच्या सानिध्यात जसे सुख आहे, असे सुख या लोकात तर काय परलोकात देखील नाही. संताच्या सानिध्यात जसे सुख आहे असे सुख भगवंताजवळ वैकुंठात देखील नाही, म्हणून भगवंत वैकुंठ सोडून सुख प्राप्तीसाठी संताच्या सानिध्यात राहतो. एका दुसऱ्या अभंगामध्ये संत एकनाथ महाराज म्हणतात...

**ज्या सुखाकारणे देव वेडावला ।वैकुंठ सोडूनी संता सदनी राहिला ।।**
**धन्य धन्य संतांचे सदन । जेथे लक्ष्मी सहीत शोभे नारायण ।।**
**एका जनार्दनी पार नाही सुखा । म्हणूनी देव भूलले देखा ।।**

संताच्या सानिध्यात जे सुख आहे ते सुख मिळविण्यासाठी भगवंत जणू वेडा होतो. वैकुंठ सोडून भगवंत ते सुख मिळविण्यासाठी संताच्या सानिध्यात राहतो. धन्य आहे ते संत सदन, जेथे भगवंत लक्ष्मीसहित विराजमान राहतो. संताच्या सानिध्यात जे अपार सुख आहे त्या सुखाच्या प्राप्तीसाठी भगवंत सर्व काही वैकुंठ आदि सोडून



देतो आणि ते सुख मिळविण्यासाठी संताच्या सानिध्यात राहतो. जे सुख संताच्या व्यतिरिक्त कुठेच नाही.

हा केवळ संत एकनाथ महाराजाचांच अनुभव आहे असे नाहा. कबीर महाराजांचा देखील हाच अनुभव आहे. असे म्हणतात की, एक वेळेस कबीर महाराज रडायला लागले. तेव्हा कबीर महाराजांना रडण्याचे कारण विचारले, तर कबीर महाराज म्हणाले...

**राम बुलावा आ गया ।**

म्हणजे भगवंताचे बोलावणे आले. विचारणारा हे ऐकून हैराण झाला की कमाल आहे. लोकांना यमदूत नेण्यासाठी येतात म्हणून ते रडतात ते भक्ती, जप, तप, इत्यादी यासाठी करतात की आम्हाला रामाचे, भगवंताचे बोलावणे आले पाहिजे. आपणास भगवंताचे बोलावणे आले तर आपणास आनंद झाला पाहिजे होता.परंतु आपण रडायला का लागले?कोणी यमदूत तर आपणास नेण्यासाठी नाही आला? कबीर महाराजांनी उत्तर दिले...

**राम बुलावा आ गया । दिया कबीरा रोय ।**
**जो सुख संत के माहि । वह वैकुंठ न होय ।।**

रामाचं म्हणजेच भगवंताच बोलावण आलं हे तर ठीक आहे परंतु मला वैकुंठात जाण्याची इच्छा नाही. कारण की, जे सुख संताच्या सानिध्यात आहे ते वैकुंठात नाही. आणि जर असतं तर भगवंत वैकुंठ सोडून संताच्या सानिध्यात का राहिले असते. भगवंत वैकुंठ सोडून संताच्या सानिध्यात राहतो आणि मी संताचे सानिध्य सोडून वैकुंठात जाऊन काय करु? जे सुख संताच्या सानिध्यात आहे ते वैकुंठात नाही म्हणून मी रडत आहे.

संताच्या संदर्भात जो अनुभव संत एकनाथ महाराजांचा तोच अनुभव संत कबीर महाराजांचा आहे आणि जो अनुभव संत

एकनाथ महाराज कबीर महाराजांचा तोच अनुभव संत नामदेव महाराजांचा आहे. नामदेव महाराज म्हणतात...

**संत संगतिचे काय सांगू सुख । आपण पारीखे नाही तिथे ।।**
**इहलोकी तोची सर्वाभूती सम । शरीराचा भ्रम नेणे कदा ।।**

संताच्या सानिध्यात जे सुख आहे ते वाणीने वर्णन करणे अशक्य आहे. संताच्या सानिध्यात हा आपला आहे, हा परका आहे. असा भेदभाव नसतो. सर्व भूतमात्रा विषयी म्हणजेच प्राणी मात्राविषयी त्यांची समान दृष्टी किंवा भावना असते. सर्व शरीरांना पाहण्यापेक्षा सर्व शरीरामध्ये विराजमान जो  आत्मा किंवा परमात्मा असतो त्याला ते पाहतात म्हणून संताच्या सानिध्यात नेहमी सुख ही सुख असते. की जे वर्णनातीत म्हणजेच वाणींने वर्णन करता येत नाही. ते तर तोच जाणतो की, जो संताच्या सानिध्यात जाऊन ते सुख प्राप्त करतो.संताच्या सानिध्यात जे सुख आहे त्याचे वर्णन जे एकनाथ महाराज, कबीर महाराज, नामदेव महाराजांनी केलेले आहे. त्याच प्रमाणे काकभुशूंण्डी ऋषी देखील गरुडाला तेच सांगतात. जसे की गरुडाने काकभुशूंण्डी ऋषीला विचारले.

**प्रथमही कहहू नाथ मतिधीरा । सब ते दुर्लभ कवन शरीरा ।**
**बड दुःख कवन कवन सुख भारी । सोउ संक्षेपही कहहू बिचारी ।।**

हे धिरबुद्धी ! सर्वात पहिले हे सांग की, सर्वात दुर्लभ शरीर कोणते आहे? सर्वात मोठे दुःख आणि सर्वात मोठ सुख कोणते आहे? हे मला थोडक्यात परंतु विचारपूर्वक सांगा...

काकभुशुंडी ऋषीने गरुडाला सांगितले.

**नर तन सम नही कवनिहू देही । जीव चराचर जाचत तेही ।**
**नरक स्वर्ग अप बर्ग निशेनी । ग्यान बिराग भगती शुभदेनी ।।**
**नही दरिद्र सम दुःख जगमाही । संत मिलन सम सुख जग नाही ।**
**पर उपकार बचन मन काया । संत सहज सुभाऊ खगराया ।।**



हे गरुडजी ज्ञान, वैराग्य, भक्ती, स्वर्ग, मोक्ष जो मानव देह मिळाल्याने प्राप्त करू शकतो. ज्या देहाची याचना सर्व चराचर जीव करतात असा नर देह सर्व शरीरामध्ये दुर्लभ आहे. दरिद्रता समान कोणतेच दुःख या जगात नाही. येथे केवळ धनाची दरिद्रता नाही तर तनाची, मनाची दरिद्रता देखील त्यात समाविष्ट आहे.

आता अंतिम प्रश्नाचे उत्तर देतात जे तन मन आणि वाचेने परोपकार करत राहतात. परोपकार करणे हाच ज्यांचा सहज स्वधर्म बनलेला आहे. अशा परोपकारी संताची भेट म्हणजे संगती समान या संसारामध्ये दुसरे कोणतेच सुख नाही.

संत एकनाथ महाराज, कबीर महाराज, नामदेव महाराज, काकभुशूंडी ऋषी या सर्वानी संताच्या सानिध्यात जे सुख घेतले आहे, त्याचे वर्णन केलेले आहे त्याच प्रमाणे संत तुकाराम महाराज म्हणतात...

**संताचीये  सुख झाले ते या देवा । म्हणऊनी सेवा करी त्यांची ।।**
**निर्गुण आकार झाला गुणवंत । घाली दंडवत पुजोनिया ।।**

संताच्या सानिध्यात जे सुख आहे, ते सुख मिळविण्यासाठी परमात्मा निर्गुण निराकार असून देखील सगुण साकार होतो. संताना दंडवत, प्रणाम करतो आणि त्यांची सेवा करतो.

केवळ संतच, संतांची महिमा आणि त्यांच्या सानिध्यातील सुखाचे वर्णन करतात असे नव्हे तर भगवान श्रीकृष्ण देखील हेच सांगतात. जेव्हा उद्धवाने भगवान श्रीकृष्णाला विचारले की, हे प्रभू आपणाला ब्रह्मांडामध्ये सर्वात प्रिय काय आहे? सर्वात प्रिय सर्वात प्रेमी आपणाला कोण आहे? हा प्रश्न ऐकताच भगवान श्रीकृष्णाला आपल्या प्रिय संतांची आठवण झाली. ते आनंदविभोर झाले त्यांच्या डोळयात आनंदाश्रू आले आणि ते म्हणाले...

**उधो ! मोहे संत सदा अतिप्यारे । ज्या की महिमा बेद उचारे ।। धृ ।।**

भगवंत म्हणाले हे उद्धव! मला संत नेहमी अतिशय प्रिय आहे.संताच्या व्यतिरीक्त या ब्रह्मांडामध्ये मला कोणीच प्रिय नाही. ज्या संतांची वेद देखील महिमा वर्णन करतात ते संत मला नेहमी अतिशय प्रिय आहे. भगवंत म्हणतात मला संत सदा प्रिय आहे. सदा म्हणजेच संत मला पूर्वी प्रिय होते आज आहे आणि भविष्य काळामध्ये देखील प्रिय राहील. आपण ऐकले असेल की, त्रेता युगामध्ये मी राम रुपाने अवतरीत झालो होतो. एक दिवस दशरथ महाराजांनी आरश्यामध्ये आपला चेहरा बघीतला, तर त्यांना आरश्यामध्ये दिसले की, आपल्या कानाजवळ काही केस सफेद झालेले आहे. सफेद केस बघून त्यांच्या मनात विचार आला की, सफेद केस जनू हे सांगत आहे की, आपले जीवन उज्ज्वल धन्य करून घेण्याची वेळ आलेली आहे त्यानी सभासदांना बोलावून लगेच राज्य रामाला सोपविण्याचा आणि स्वतः वनात जाण्याचा निर्णय घेतला. कारण की जेव्हा दशरथ महाराजांनी सभेमध्ये सभासदांना विचारले की, हे सभासदानो मी आता हे राज्य रामाला देण्याचा विचार केला आहे. आणि आपणास मी हे विचारीत आहे की, राम राज्य सांभाळण्यास योग्य आहे किंवा नाही तर सर्व सभासदांनी एकमतांनी सांगितले की, महाराज आम्ही आपल्या विचाराशी सहमत आहोत. कारण राम आता राजाच्या योग्य आहे. एकाने देखील या विचाराचा विरोध केला नाही. सर्वांनी संमती दिली.

राज्य देण्याचा विचार एक मताने घेण्यात आला. हे ऐकून राम अत्यंत दुःखी झाले, लगेच त्यांनी सरस्वती मातेची प्रार्थना केली की, हे माता माझ्यावर खूप मोठे संकट आलेले आहे. मला त्या संकटापासून वाचव. संकट हे आहे की, माझे वडील दशरथ महाराज आणि सर्व सभासदांनी एकमताने मला राजा बनविण्याचा निर्णय घेतला आहे. आणि मी राजा बनण्यासाठी आलो नाही. मी तर साधू संतांची सेवा करण्यासाठी



आलेलो आहे. हे माता माझ्यावर कृपा कर की उद्या मला राज्य न मिळता वनवास मिळाला पाहिजे. सरस्वतीमातेने ती प्रार्थना ऐकली. सरस्वतीमातेने मंथरेची व मंथरेने कैकयीची बुद्धी फिरविली. कैकयीने भरताला राज्य व रामाला चौदा वर्षाचा वनवास मागून घेतला आणि भगवान राम मोठ्या आनंदाने संतांची सेवा करण्यासाठी, सत्संगाचा लाभ प्राप्त करून घेण्यासाठी वनात गेले, कारण की भगवंत तर साधू-संतांची सेवा करण्यासाठीच या संसारामध्ये आले होते. जेव्हा अर्जुनाने विचारले की, हे भगवंता आपण या संसारामध्ये अवतार का धारण करतात तर भगवंताने गीतेमध्ये सांगितले.

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामी युगे युगे ।।**

भगवंताने अवताराचे जे कारण सांगितले त्यामध्ये पहिले कारण आहे परित्राणाय् साधूनाम् - साधू पुरूषांची सेवा करण्यासाठी मी प्रत्येक युगामध्ये अवतार धारण करतो...

भगवंत ज्या वेळेस अवतार धारण करतात तर त्या वेळेस काय करतात? तर भगवंत म्हणतात...

**मै संतन के पिछे जाऊ जहाँ जहाँ संत सिधारे ।**
**चरणन रज निज अंग लगाऊ शोधू गात हमारे ।।१।।**

मी अवतार धारण केल्यानंतर संत ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी जातो. तेथे गेल्यानंतर त्यांच्या चरणाची धूळ मी माझ्या शरीरावरती धारण करतो. ज्याने माझे शरीर पवित्र होऊन जाते. म्हणून मूळ अभंगामध्ये संत एकनाथ महाराज म्हणतात की... ''अमृत त्यांचे पायी नित्य वसे.'' त्यांच्या चरणामध्ये नित्य अमृताचा निवास असतो. म्हणून भगवंत म्हणतात की, त्यांची चरणधुळी मी आपल्या मस्तकावर धारण करतो. सत्संग प्रवचन सुरू होण्यापूर्वी

जसे सांगितले होते...

**सुख ईश्वर के भजन मे और संतने के माही ।**

दोनच ठिकाणी सुख आहे एक ईश्वराच्या भजनामध्ये आणि दुसरे जसे आपण आत्ताच ऐकले संतांच्या सानिध्यामध्ये सुख आहे. सुखाच्या संदर्भात संत तुकाराम महाराज म्हणतात की...

**आपुला तो एक देव करूनी घ्यावा । तेणे विन जीवा सुख नाही ।।**

परत्म्याला जोपर्यंत आपण आपला बनवित नाही परत्म्याची जोपर्यंत प्राप्ती होत नाही तोपर्यंत आपणास सुखाची प्राप्ती होऊ शकत नाही. या अभंगाच्या चरणाचा विचार केला तरी देखील संतांच्या सानिध्यात राहणे अतिशय आवश्यक आहे.कारण की भगवान श्रीकृष्ण म्हणतात.

**संत मिले तब मै मिल जाऊ संत न मुझसे न्यारे ।**
**बिना संत संग मोहे नही पावे कोटी जतन कर हारे ।।**

संत जेव्हा मिळतात तेव्हा मी आवश्य मिळतो आणि सत्य तर हे आहे की संत माझ्यापासून वेगळे नाही. संत आणि माझ्यात अंतर नाही. मीच या पृथ्वीवर संताच्या रूपाने अवतार धारण करतो.

**पृथ्वीतळी देवता साधू । साधू दिनाचे सख्खे बंधू ।**
**साधू रूपे मी परमानंदू । जाण प्रसिद्धू परमात्मा ।।**

या पृथ्वीवर मीच संताच्या रूपाने अवतरित होतो

हे सर्व ऐकल्यानंतर देखील आपणास सुखाच्या प्राप्तीसाठी भगवंताची प्राप्ती झाली पाहिजे असे वाटत असेल, तरी देखील संताच्या सानिध्यात जावेच लागेल कारण भगवंत म्हणतात...

**''बिना संत संग मोही नही पावे । कोटी जतन कर हारे''।।**

भलेही करोडो उपाय करा तरी देखील संताच्या कृपेशिवाय भगवंत मिळत नाही. म्हणून भगवंताची प्राप्ती करून घ्यावयाची असेल तर संताच्या सानिध्यात जावेच लागेल. अजून एक विचार ध्यानात



ठेवला पाहिजे की सेवे शिवाय भगवंत मिळत नाही म्हणून सेवा झालीच पाहिजे. भगवंताची सेवा करायची असेल अगोदर तर संताची सेवा करायला पाहिजे कारण भगवंत म्हणतात..

**जो संतन्ह के सेवक जगमें । सो मम सेवक भारे ।**
**ब्रह्मानंद संत जन पल में । सब भव बंधन टारे ।।**

संताचे जे सेवक आहे ते माझेही सेवक आहे. कारण संताची सेवा माझीच सेवा आहे. याचे कारण मीच सगून रूपाने संताच्या रूपाने राहतो व संताच्या रूपाने राहून भक्ताचे सर्व भवबंधन तोडून टाकतो. म्हणून या जगामध्ये सुख आणि परलोकामध्ये सद्गती प्राप्त करायची असेल तर त्यासाठी संताच्या सानिध्यात राहिले पाहिजे.

तात्पर्य सुख प्राप्ती साठी देवतांकडे जाण्यापेक्षा पहिले संताच्या सानिध्यात जायला पाहिजे कारण .

**त्या देवापरीस साधू अधिक । हे साच मज मानिले देख ।**
**देव चरिते उठे सुख दुख । साधू निर्दोष सुखाचे दाते ।।**

देवतांपेक्षा संत श्रेष्ठ आहे कारण देवतांचा अवतार झाल्यानंतर काही सुखी तर काही दुःखी होतात. जसे भक्त सुखी होतात तर असूर दुःखी होतात. परंतु संतांचा अवतार सर्वांच्या कल्याणासाठी आणि सर्वांच्या सुखासाठी असतो.

हे सर्व ऐकल्यानंतर काहींच्या मनामध्ये शंका निर्माण होऊ शकते की शेवटी असे काय कारण आहे की, जे सुख देवताजवळ नाही ते सुख संताजवळ आहे या शंकेच्या समाधानासाठी संत एकनाथ महाराज म्हणतात...

**अमृत त्यांचे पायी नित्य वसे ।**

संताच्या चरणात नित्य अमृताचा निवास आहे म्हणून त्यांच्या चरणाचा स्पर्श तर काय त्यांच्या चरणाच्या धुळीचा स्पर्श जरी झाला

तर काय लाभ होतो, हे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगामध्ये म्हणतात...

**संत चरण रज लागता सहज । वासनेचे बिज जळूनी जाय ।।**
**मग राम नाम उपजे आवडी । सुख घडोघडी वाढो लागे ।।**
**कंठी प्रेम दाटे नयनी निर लोटे । हृदयी प्रगटे राम रुप ।।**
**तुका म्हणे साधन सुलभ गोमटे । परी उपतिष्ठे पूर्व पुण्ये ।।**

संताच्या चरणामध्ये नित्य अमृताचा निवास असतो म्हणून त्यांच्या चरणाची धूळ सहज लागली तर पहिला लाभ हा होतो की, वासनेचे बीज जळून जाते. वासनेचे बीज जळून गेल्याने जन्म मृत्यूचे चक्र समाप्त होते. कारण **जन्म घेणे लागे वासनेच्या संगे** वासनेमुळे जन्म मृत्यूचे चक्र चालू राहते. चरण स्पर्शाने म्हणजे संताच्या सानिध्यात गेल्याने त्यांचा बोध श्रवण केल्याने मनन, चिंतन केल्याने आणि संत ज्या धर्म मार्गावर, कर्म मार्गावर, भक्ती मार्गावर व ज्ञान मार्गावर चालतात त्या मार्गावर जो चालतो तो संत चरण रज लागल्याने म्हणजेच त्यांच्या मार्गावर जो चालतो त्याचे वासना बीज जळून जाते. वासना बीज जळताच भगवंताचे नामस्मरण, चिंतन व्हायला लागते. आणि नामस्मरण चिंतनाने क्षणोक्षणी सुखाची अनुभूती व्हायला लागते. भगवंताच्या नाम रुपाचे चिंतन होताच नेत्रातून आनंद अश्रू येतात. हृदयात भगवंताचे रुप प्रगट होते. भगवंताचे रुप प्रगट होताच या जगामध्ये आनंद आणि परलोकामध्ये सद्‌गती मोक्ष प्राप्त होतो अगदी सहज होणारे हे साधन आहे, परंतु असा संत संगाचा संयोग सर्वांना प्राप्त होत नाही. कारण त्या साठी पूर्व पुण्य असणे अत्यंत आवश्यक आहे. जे पुण्यात्मा संत भक्त असतात ते किंवा भगवंत संताच्या सानिध्यात जातात आणि संताच्या चरणाचा महिमा जाणतात. म्हणून ज्या संत एकनाथ महाराजांनी संताच्या चरणाचा महिमा जाणला ते



संत एकनाथ महाराज संत चरणाच्या महिम्याबद्दल म्हणतात.

**अमृत त्यांचे पायी नित्य वसे**

त्यांच्या चरणामध्ये नित्य अमृताचा निवास असतो ऐवढेच नव्हे तर ते एका अन्य अभंगामध्ये म्हणतात.

**संत चरणीचा महिमा । काही न कळे आगमा निगमा ।**
**ब्रह्मा घाली लोटांगण । विष्णू वंदीतो आपण ।।**
**शिव ध्यातो पायवनी । धन्य धन्य संत जनी ।।**

संताच्या चरणाचा जो महिमा आहे, तो आगम आणि निगम समजू शकत नाही. याचा अर्थ हा नाही की, संत चरणाचा महिमा कोणीच जाणत नाही. जसे ते म्हणतात ब्रह्मदेव संत चरणाला दंडवत करतात. विष्णू भगवान वंदन करतात आणि शंकर भगवान संताच्या चरणाचे ध्यान करतात.

म्हणून संत चरणावर म्हणजेच संत मार्गावर ज्या मार्गाने संत चालतात त्या धर्ममार्ग, कर्ममार्ग, भक्तीमार्ग, ज्ञानमार्गाने चालायला पाहिजे. जो चालत नाही त्याची कशी दुर्गती होते हे पुढील एका अभंगामध्ये संत एकनाथ महाराज सांगतात...

**जया संत चरणी नाहीच विश्वास । धिक त्यास वास यमपुरी ।।**
**संत चरणी मन ठेवा रे निश्चल । करुणा उतावेळ भाका त्यांची ।।**
**घाला लोटांगण वंदिपा चरण । तेणे समाधान होईल मना ।।**
**एका जनार्दनी संतसंगावाचोनी । तरला तो कोणी मज सांगा ।।**

संत एकनाथ महाराज म्हणतात की ज्याचा संत चरणावर म्हणजेच संताच्या मार्गावर, वचनावर विश्वास नाही त्याला यमपुरीत जावे लागते. म्हणून संत चरणावर म्हणजेच संत ज्या मार्गावर चालतात त्या मार्गावर विश्वास ठेवला पाहिजे, त्या मार्गावर चालले पाहिजे. त्यांना दंडवत प्रणाम केल्याने, चरण वंदनाने समाधान प्राप्त

होते. शेवटी संत एकनाथ महाराज म्हणतात या संसारामध्ये असा कोणीच नाही की ज्याची सद्‌गती विना संताच्या संगतीने झालेली आहे. म्हणजेच या संसारामध्ये सुख व अंतीम मोक्ष प्राप्त करायचा असेल तर संताच्या संगतीत जायलाच पाहिजे. म्हणून मूळ अभंगाच्या दुसऱ्या चरणामध्ये म्हणतात ..

**संताचे संगती होय मोक्ष प्राप्ती । नको पा संगती दुर्जनाची ।।**

या संसारामध्ये सुख आणि परलोकामध्ये सद्‌गती, मोक्ष प्राप्त करायचा असेल तर त्यासाठी संताची संगतीच पाहिजे. दुःख अशांती, व्यसनापासून, विकारापासून आणि जन्म मृत्यूच्या चक्रापासून मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी संताची संगती केली पाहिजे. परंतु या ठिकाणी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट नेहमी लक्षात ठेवली पाहिजे ती ही की **नको पा संगती दुर्जनाची** जीवनामध्ये कधी चुकून देखील दुर्जनाची संगती करू नये. त्यासाठी अभंगाच्या तिसऱ्या चरणामध्ये संत एकनाथ महाराज म्हणतात...

**दुर्जनाच्या संगे दुःख प्राप्त होय । तेथे कैसी सोय तरावया ।।**

दुर्जनाच्या संगतीने या संसारामध्ये दुःख अशांती आणि मृत्यू. नंतर अधोगती ही अधोगती प्राप्त होते. म्हणून कधीही चुकून देखील दुर्जनाची संगती धरू नये.

तात्पर्य हेच आहे की, संताच्या संगतीने या संसारामध्ये सुख आणि परलोकामध्ये सद्‌गती मिळते. दुर्जनाच्या संगतीने या लोकामध्ये दुःख आणि मृत्यूनंतर दुर्गती नरकाची प्राप्ती होते. म्हणून नेहमी संताच्या सानिध्यात राहिले पाहिजे व चुकून देखील कधी दुर्जनाची संगती धरू नये. म्हणून संत कुणाला म्हणतात आणि दुर्जन कुणाला म्हणतात? संताचे आणि दुर्जनाचे काय लक्षणे आहे? हे चांगल्या प्रकारे जाणले पाहिजे. म्हणून संत बहेणाबाई देखील म्हणते...



**संत असंताचे शरीर सारखे । भिन्नत्व ओळखे क्रियेपासी ।।**
**काय सांगो फळ दोन्हीचे वेगळे । जाणत्यासी कळे ज्ञानदृष्टी ।।**
**खरे आणि खोटे सारखेची नाणे । ताक दूध गुण वेगळेची ।।**
**बहेणी म्हणे ढोंगी साधू ओळखून । पुढे त्याचे गुण अंगीकारी ।।**

संत आणि असंताचे सज्जनाचे आणि दुर्जनाचे शरीर डोळयाने बघितल्यानंतर सारखेच वाटते म्हणजेच सज्जनाच्या आणि दुर्जनाच्या शरीर रचनेत काहीही बदल नसतो त्याची क्रिया मात्र भिन्न असते. सज्जन इतरांच्या कल्याणासाठी आपले तन, मन, धन सर्वस्व अर्पण करतात. तर दुर्जन स्वतःच्या स्वार्थासाठी अनेकांचे धन, तन हरण करतात. व वेळप्रसंगी अनेकांचे विनाकारण जीव घेतात म्हणून दोन्हींच्या सानिध्यात गेल्यानंतर वेगवेगळे फळे मिळतात. हा फरक ज्यांना ज्ञानदृष्टी असेल त्यांनाच कळतो. जसे उदाहरण दिले खरे आणि खोटे नाणे, ताक आणि दूध दिसायला सारखेच असले तरी परंतु त्याच्यापासून मिळणारा लाभ मात्र भिन्न असतो. साधू आणि सादूदेखील सारखेच वाटतात. साधू म्हणजे ज्याने सहा विकार काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर धुतले असेल असा साधू व सादू म्हणजे संधिसाधू जसा रावणाचा फक्त वेश साधूचा होता. परंतु तो साधू नव्हता. राम लक्ष्मण कुटियात नाही सीता एकटीच आहे ही संधी साधून तो सीतेला उचलून बळजबरीने घेऊन गेला. असे ढोंगी सादू व खरे साधू आपण ओळखले पाहिजे. जे खरोखरच साधू असेल तर त्यांच्या संगतीत गेले पाहिजे. त्यांचा बोध श्रवण केला पाहिजे व तो जीवनात आचरणात आणला पाहिजे. त्याने आपले तर कल्याण होतेच आपणाला तर सुख मिळतेच, परंतु आपल्या सानिध्यात जो कोणी येईल त्याला देखील सुख मिळेल व त्यांचे देखील कल्याण होऊन जाईल. म्हणून खरे संत ओळखले पाहिजे. व त्यांच्या सानिध्यात गेले पाहिजे.

हे सर्व ऐकल्यानंतर मनात प्रश्न निर्माण होऊ शकतो की संत ओळखायचे कसे? संताचे लक्षणे काय आहे?

प्रथम आपण हे बघितले पाहिजे की संत ओळखायचे कसे? कसे जाणायचे की हे संत आहे? यासाठी संत रामदास स्वामी म्हणतात...

**पृथ्वीमध्ये बहुत जण । त्यामध्ये असती सज्जन ।**
**परी साधूस जाणतो कोण । साधू वेगळा ।।**

या पृथ्वीवरती अनेक प्रकारचे लोक असतात. त्यामध्ये बरेच सज्जन साधू देखील असतात. परंतु त्या साधू, संताना तोच जाणतो जो स्वतः साधू असेल, संत असेल. कारण जोपर्यंत आपण स्वतः साधू - संत होत नाही तोपर्यंत आपणास साधूसंत ओळखता येणार नाही व जोपर्यंत आपणास साधूसंत ओळखता येणार नाही तोपर्यंत आपण त्यांच्या सानिध्यात जाऊन सुखाची व भगवंताची प्राप्ती करून घेऊ शकत नाही. त्यासाठी आपण स्वतः आगोदर साधूसंत झाले पाहिजे. आपण असे ऐकल्यानंतर असा मनात प्रश्न निर्माण होऊ शकतो की, साधू - संताचे लक्षणे काय आहे? हाच प्रश्न नारदमुनीच्या देखील मनात निर्माण झाला होता. त्यांनी मर्यादा पुरुषोत्तम रामाला, रघुनाथाला विचारले...

**संतन्ह के लक्षण रघुबिरा । कहहू नाथ भव भंजन भिरा ।।**

हे भव भयाचा नाश करणारे राघव, रघूविर मला संताचे लक्षणे सांगा. असे विचारल्यानंतर भगवंत म्हणतात...

**सुनू मुनी संतन्ह के गुण कहहू ।जिन्ह ते मै उन्हे के बस रहहू ।**
**षट विकार जीत अनघ अकामा । अचल अकींचन सुचि सुख धामा ।।**
**अमित बोध अनिह मीतभोगी । सत्यसार कबी कोविद जोगी ।**

हे मुनी मी संतांचे लक्षणे सांगतो ते आपण ऐका की, ज्या लक्षणामुळे मी संताच्या अधिन राहतो. ते लक्षणे म्हणजे संत त्यांना



म्हणतात ज्यांनी सहा विकार जिंकलेले आहे. जे निष्पाप आहे, ज्यांना कसल्याच प्रकारची कामना नाही म्हणजे जे अकाम आहे, भक्ती मार्गावर, आपल्या ध्येयावर जे अचल आहे म्हणजेच स्थिर आहे, अकिंचण आहे म्हणजेच द्रव्याची अभिलाषा ज्यांना नाही, अंतरर्बाह्य शुद्धता राखतात. सुखाचे धाम आहे ज्यांच्याजवळ अमीत बोध म्हणजेच ज्ञान आहे. मितभोगी, सत्य सार ग्रहण करणारे आहे, कवी आहे, ज्ञानी आहे, योगी आहे त्यांना संत म्हणतात. अजून संताचे लक्षणे सांगतात....

**गुणागार संसार दुःख रहीत बिगत संदेह ।**
**तजी मम चरण सरोज प्रिय तिन्ह कहु देह न गेह ।।**

ज्यांच्याजवळ गुण ही गुण आहे संसाराच्या दुःखाने रहीत म्हणजेच संसाराचे कसल्याच प्रकारचे दुःख त्यांना नाही. सर्व संदेह ज्यांचा निवृत्त झालेला आहे, सर्वात मोठा संदेह हा असतो की, भगवंत आहे किंवा नाही. परंतु संत त्यांना म्हणतात..

**जो जाणेल भगवंत । तया नाव बोलीजे संत ।**
**जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ।।**

ज्यांनी भगवंताला जाणले असेल त्यांना संत म्हणतात. भगवंताला जाणल्यामुळे संताच्या मनातील सर्व संदेह निवृत्त होतो. म्हणून बिगत संदेह म्हणजेच संदेह रहीत अवस्था हे संताचे लक्षण असते. संतानी शाश्वत आणि अशाश्वत याचा निवाडा केलेला असतो त्यामुळे भगवंता व्यतीरिक्त सर्व नाशवान आहे हे संतानी जाणलेल असतं त्यामुळे संतांना भगवंत एवढे प्रिय असतात की भगवंताशिवाय देह घर आदि काहीच प्रिय राहत नाही, आवडत नाही. कसलीच संतांना आशा नसते संत कबीर महाराज देखील म्हणतात....

**आशा तजै माया तजै मोह तजै अरुमान ।**

**हरष शोक निंदा तजै कहे कबीर संत जान ।।**

ज्यांना कसल्याच प्रकारच्या लौकीक सुखाची आशा नाही. ज्यांनी मोह - ममतेचा त्याग केलेला आहे. ज्यांना मान - सन्मानाची ईच्छा नाही. हर्ष आणि शोक इत्यादींचाही ज्यांनी त्याग केलेला आहे, जे कुणाची निंदा करत नाही व ऐकत देखील नाही ते संत आहे.म्हणजेच संत संसार बंधनापासून मुक्त असतात व नेहमी आत्मचिंतनामध्ये निमग्न असतात. समर्थ रामदास स्वामी देखील म्हणतात...

**सदा स्वरुपानूसंधान । हे मुख्य साधूचे लक्षण ।**
**जनी असोन आपण । जगावेगळा ।।**

संत नेहमी आत्म-परमात्मचिंतनामध्ये निमग्न असतात. स्वस्वरुपाच्या चिंतनामध्ये नेहमी निमग्न असतात. जगात असूनदेखील ते जगाच्या वेगळे असतात. म्हणजेच जगाच्या मोह-ममतेपासून, सुख-दुःखा पासून मुक्त असतात.

आतापर्यंत जेवढे संताचे लक्षणे सांगितले किंवा आयुष्यभर संताचे लक्षणे कुणी सांगत राहिले ते सर्व आपण ऐकले पाठ केले किंवा लिहून घेतले व त्या प्रमाणे संताचा शोध करण्यासाठी आपण निघाले तरी आपणास संत शोधता येणार नाही. कारण संत तुकाराम महाराज म्हणतात...

**अनंत लक्षणे वर्णिता अपार । संताचे ते घर सापडेना ।।**
**जये घरी संत राहती आपण । ते तुम्हा ठिकाण आतूडेना ।।**
**संत होऊनिया संतासी पाहावे । तरीच तरावे तुका म्हणे ।।**

संताचे एक - दोन, शंभर - दोनशे, हजार - दोन हजारच काय परंतु अनंत लक्षणे आपणास माहीत असेल तरी परंतु आपणास संत तोपर्यंत ओळखता येणार नाही जोपर्यंत आपण स्वतः संत होत नाही. म्हणजेच आपण स्वतः संत झाल्याशिवाय आपणास संत ओळखता



येणार नाही. हे ही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, जोपर्यंत आपणास संत ओळखता येणार नाही तोपर्यंत आपण संताची संगती धरू शकत नाही. जोपर्यंत संताची संगत धरू शकत नाही तोपर्यंत आपण भवसागरातून तरूच शकत नाही. थोडक्यात संतानांच संताची ओळख होते, म्हणून संत चोखा महाराज देखील म्हणतात...

**संताचा अनुभव संतच जाणती । येर ते हासती अभाविक ।।**

संतच संतांना जाणतात, ओळखतात. दुर्जन सज्जनांना, संतांना ओळखू शकत नाही. म्हणून या जगात सुख व परलोकात आपणास सद्गती हवी असेल, मुक्त व्हावयाचे असेल तर त्यासाठी संताची संगती धरली पाहिजे व दुर्जनाची संगती टाळली पाहिजे यासाठी सज्जन व दुर्जन यातील भेद देखील आपणास कळालाच पाहिजे.

सज्जन दुर्जन म्हणजेच संत व असंत यातील भेद कळण्यासाठी भरत भगवान श्रीरामाला म्हणतात...

**संत असंत भेद बिलगाई । प्रणत पाल मोही कहहू बुझाई ।।**

हे शरणागतवत्सल, शरणागताचे रक्षण करणारे प्रभू, मला संत आणि असंताचा भेद वेगवेगळा समजाऊन सांगा.

भगवान राम भरताला संत असंताचे लक्षण समजावून सांगतांना म्हणतात...

**संतन्ह के लच्छन सुनू भ्राता । अगनीत श्रूती पुराण बिख्याता ।।**

हे भरत संताचे लक्षणे असंख्य आहेत जे वेद आणि पुराणामध्ये वर्णन केलेले आहे जसे ....

**संत असतन्ही कै असि करनी । जिमी कुठार चंदन आचरणी ।।**
**काटई परसु मलय सुनु भाई । निज गुन देई सुगंध बसाई ।।**

संत आणि असंताचे असे आचरण असते जसे कुऱ्हाड आणि

चंदनाचे आचरण असते. कुऱ्हाड चंदनाला तोडते, घाव घालते कारण तिचा स्वभावच तोडण्याचा आहे. परंतु चंदन आपणाला तोडण्याऱ्या कुऱ्हाडीस देखील सुगंध आणि शितलता देते. कारण तो चंदनाचा स्वभाव आहे.

त्याच प्रमाणे म्हणजेच कुऱ्हाडीप्रमाणे दुर्जनाचा स्वभाव असतो की, जे दुसऱ्याला नेहमीच दुःख देत राहतात. सज्जनाचा, संतांचा स्वभाव चंदनाप्रमाणे असतो की, आपल्यावर अपकार करणाऱ्यावर देखील ते उपकारच करत राहतात.

शेवटी या कर्माचे फळ सज्जन दुर्जनाला काय मिळते? तर म्हणतात...

**ताते सूर सीसन्ह चढत जग बल्लभ श्रीखंड ।**
**अनल दाही पीटत घनही परशु बदन यह दंड ।।**

चंदन आपल्या या गुणामुळे देवतांच्या मस्तकावर शोभायमान होते व कुऱ्हाडीला हा दंड मिळतो की तिला अग्नीमध्ये तापविल्याजाते व वरून घनाचे आघात पडतात. त्याचप्रमाणे जे सज्जन - संत असतात ते स्वर्ग आदि लोकामध्ये जातात व दुर्जन नरकामध्ये चौऱ्याशिंच्या फेऱ्यामध्ये भ्रमण करतात. नरकप्राय या जगामध्ये दुःख भोगत राहतात.

ज्या प्रमाणे संत - असंताचा भेद भरताने भगवान रामाला विचारला त्याच प्रमाणे भगवान विष्णूचे वाहन गरूडाने काकभुशूंडी ऋषी जे ईच्छामरणी, ईच्छा देहधारणी, भूत, भविष्य, वर्तमान याचे ज्यांना ज्ञान आहे त्यांना विचारतात...

**संत असंत मरम तूम्ह जानहूँ । तिन्ह कर सहज सुभाव बखानहूँ ।।**

हे ऋषी आपण संत आणि असंत म्हणजेच सज्जन आणि दुर्जन याचे मर्म जाणतात. तेव्हा मला हे सांगा की त्यांचा स्वभाव



कसा असतो म्हणजेच त्यांचे लक्षणे काय असतात? असे विचारल्या नंतर काकभुशूंडी ऋषी म्हणतात...

**संत सहहि दुःख पर हित लागी । पर दुःख हेतू असंत अभागी ।।**
**भुर्ज तरु सम संत कृपाला । परहित नितीसह बिपती बिसाला ।।**

संत दुसऱ्याला सुख देण्यासाठी, दुसऱ्याचे चांगले करण्यासाठी, दुसऱ्याच्या हितासाठी, कल्याणासाठी स्वतः रात्रंदिवस दुःख सहन करत राहतात.

परंतु असंत, दुर्जन, अभागी दुसऱ्याला दुःख देण्यासाठी, दुसऱ्याला अधोगतीला नेण्यासाठी रात्रंदिवस दुःख सहन करतात.

कृपाळू संत भोज वृक्षासमान दुसऱ्यांच्या हितासाठी मोठी विपत्ती देखील सहन करतात. जसे भोजवृक्ष आपली साल देतो तसे संत सर्वस्व जगाच्या कल्याणासाठी अर्पण करतात. अजून दुर्जनाचे लक्षणे, स्वभाव कळण्यासाठी ते सांगतात...

**सन इव खल पर बंधन करई । खाल कढाई बिपती सहि मरई ।।**
**खल बिनू स्वारथ पर अपकारी । अहि मुषक इव सुनू उरगारी ।।**

दुष्ट तागाच्या झाडाप्रमाणे आपली साल दुसऱ्याला बांधण्यासाठी देतात म्हणजेच विनाकारण अपकार करत राहतात. त्याच प्रमाणे उंदिर आणि साप यांना खाण्यासाठी, पिण्यासाठी दिले तरी जसे ते अहितच करतात त्या प्रमाणे दुष्ट, दुर्जन, असंत त्यांच्यावर उपकार केला व खाण्यासाठी, पिण्यासाठी दिले तरी ते आपले अहितच करतात.

दुर्जन केवळ ज्यांच्या सानिध्यात राहतात त्यानांच त्यांच्यापासून दुःख होते असेच नाही तर अनेकांना दुर्जनामुळे दुःख होते त्यासाठी अजून उदाहरण दिले.

**दुष्ट उदय जग आरती हेतू । जथा प्रसिद्ध अधम ग्रह केतू ।।**

अधमग्रह केतूचा उदय होताच जसे जगामध्ये दुःख निर्माण होते. त्याच प्रमाणे दुष्टांच्या म्हणजेच दुर्जनाच्या संसंर्गाने त्या घरात, गावात, भागात अनेकांना दुःख ही दुःख प्राप्त होते.

ज्या प्रमाणे दुर्जनामुळे अनेकांना दुःख होते त्याच प्रमाणे संतामुळे अनेकांना सुखाची प्राप्ती होते. त्यासाठी उदाहरण दिले...

**संत उदय सतत सुखकारी । बिस्व सुखद जीमी इंदू तमारी ।।**

जसे आकाशात चंद्रमा किंवा सूर्य उदय झाल्यानंतर जगामधला अंधार नाहीसा होतो. अंधःकाराने होणाऱ्या दुःखापासून, भयापासून सुटका होते. त्याचप्रमाणे संताच्या अवतारामुळे अज्ञान अंधःकारापासून मुक्तता होते. जीवनात सुख, समाधान, शांतता प्राप्त होते. कारण संत जग़ाचा उद्धार करण्यासाठीच या जगात अवतार धारण करतात. जसे संत नामदेव महाराज म्हणतात...

**ब्रह्ममूर्ती संत जगी अवतरले ।उद्धराया आले दिन जना ।।**
**ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी । नाम घेता वदनि दोष जाती ।।**
**हो का दुराचारी विषयी आसक्त । संत कृपे त्वरित उद्धरतो ।।**

ब्रह्मस्वरुप संत जगाच्या दिनजनांच्या कल्याणासाठीच या जगात अवतार धारण करतात. ब्रह्मादी देवता देखील त्यांना वंदन करतात. संताच्या नामस्मरणाने सर्व दोष निवृत्त होतात. कितीही दुराचारी, विषयी, आसक्त आसला तरी संत कृपेने उद्धरून जातो, मुक्त होतो. जसे अजामिळ दुर्जनाच्या संगतीने दुर्जन झाला. व्यसनीच नव्हे तर वेश्येचा संगही तो करायला लागला. पत्नीला घरातून काढून दिले व वेश्येला घरात आणून ठेवले तिच्यापासून त्याला मुलेही झाली. अशा प्रकारे व्यसनामध्ये, विषयामध्ये आसक्त अजामिळाला कर्म धर्म



संयोगाने, पूर्वीच्या प्रारब्धाने संत मिळाले. मुलाचे नाव संतांनी नारायण ठेवायला सांगितले. यमदूत नेण्यासाठी आल्यानंतर नारायण नावाचा उच्चार झाला नारायणाचे दूत आले. यमदूतापासून त्याला सोडविले नामाचा, संताचा प्रभाव त्याने जाणला. सर्व सोडून भगवंताच्या स्मरणाने तो त्याच जन्मात मुक्त झाला. म्हणून संताची संगती मिळाली पाहिजे हे सर्व सांगण्याचा उद्देश हाच आहे की, जो एकनाथ महाराजांनी मूळ अभंगामध्ये दुसऱ्या व तिसऱ्या चरणात सांगितला. ते म्हणतात...

**संताचे संगती होय मोक्ष प्राप्ती । नको पा संगती दुर्जनाची ।।**
**दुर्जनाच्या संगे दुःख प्राप्त होय । तेथे कैसी सोय तरावया ।।**

संताच्या संगतीने या जगामध्ये सुख व मृत्यूनंतर मोक्षाची प्राप्ती होते. परंतु त्यासाठी दुर्जनाची संगती टाळली पाहिजे कारण दुर्जनाच्या संगतीने या जगात दुःख व मृत्यूनंतर अधोगती नरक किंवा चौऱ्याशींची प्राप्ती होते. म्हणून आपणास तरायचे असेल म्हणजेच अधोगतीला जायचे नसेल तर त्यासाठी दुर्जनाची संगती टाळून संताच्या संगतीत राहिले पाहिजे संतांची संगती मिळाली पाहिजे. परंतु संतांची संगती होणे एवढे सोपे नाही. हे महान पुण्यात्मा ऋषीमुनी, साधूसंत जाणतात. जसे तुकाराम महाराज भगवंताकडे प्रार्थना करतात. की हे प्रभू आम्हाला संताची संगती नाहीच मिळाली तर कमीत कमी **मज दास करी त्यांचा । संत दासांच्या दासांचा** मला संताची संगती नाहीच घडली तर संतांच्या सेवकाचा जो सेवक असेल त्याची संगती, त्याची सेवा तरी घडू दे, अशी मागणी तुकाराम महाराजांनी भगवंताकडे केली. हे एकल्यानंतर मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, संताच्या सेवकाचा जो सेवक असेल त्याची संगती घडल्याने जीवनात काय लाभ होऊ शकतो? तर या प्रश्नाच्या

उत्तरासाठी राणी रत्नावलीची कथा जरूर ऐकली पाहिजे. राणी रत्नावलीची कथा महापुरुष अशी सांगतात...

राजस्थानमध्ये अबेरचे राजा माधोसिंह. त्यांच्या पत्नीचे नाव होते राणी रत्नावली. राणी रत्नावलीची एक दासी होती की, जी महालात आल्यानंतर राणीला अत्यंत आनंद व्हायचा, सुख मिळायचे. अनेक वेळेस हा अनुभव आल्यानंतर एक दिवस राणीने त्या दासीला विचारले की, हे दासी असे काय कारण आहे क़ी, माझ्याजवळ सर्व भोगऐैश्वर्याची साधने असतांना मी राणी असतांना, अनेक दास दासी माझ्या सेवेला असतांना देखील मला जे सुख मिळत नाही त्यापेक्षा अनंत पटीने तू सुखी आहेस. तुझ्याजवळ जे सुख आहे त्यामुळे तू माझ्या सानिध्यात येताच मला देखील ते सुख मिळावयास लागते याचे कारण काय? जास्तीच आग्रह केल्यानंतर दासीने सांगितले की राणीसाहेब! माझ्या जीवनात जे सुख आहे त्याचे कारण म्हणजे संतसंग हेच आहे. म्हणजेच मी एका संताच्या सानिध्यात जाते त्यांचा उपदेश श्रवण करते, जीवनामध्ये त्याचे पालन करते म्हणून माझ्या जीवनात एवढे सुख आहे व त्यामुळेच मी आपल्या सानिध्यात येताच आपणास देखील सुख मिळते.

हे ऐकल्यानंतर राणी म्हणाली की, हे दासी ! तुझ्या सुखाचे जर खरे कारण हेच असेल तर ते सुख मिळविण्यासाठी मी देखील त्या संताकडे येते. मला त्यांच्याकडे घेऊन चल. दासी म्हणाली की, राणी साहेब! संताकडे जाण्यासाठी एक मर्यादा आहे. राणीने विचारले कोणती मर्यादा? दासी म्हणाली...

**संत दरशन को जाईये तज मोह माया अभिमान**
**ज्यो ज्यो पग आगे धरे कोटी यज्ञ समान**



संताकडे जायचे असेल तर त्यासाठी मोह, माया, अभिमानाचा त्याग करून गेले पाहिजे. अशा मर्यादेने जो संताकडे जातो प्रत्येक पाऊल तिकडे जाण्यासाठी टाकतो, तेव्हा करोडो यज्ञाचे फळ मिळते. राणी विवेकी होती, खऱ्या सुखाची तिला अभिलाषा होती. त्यामुळे राणीने सर्व दागिने व राजसी वस्त्रांचा त्याग करून सामान्य वस्त्र परिधान केले. सामान्य स्त्रियाप्रमाणे ती त्या संतांच्या सत्संग प्रवचनामध्ये जाऊन बसली. एकाग्रमनाने तो बोध श्रवण केला. त्याचे पालन करायला लागली. त्यामुळे अल्पावधीत त्या राणीला सुख ही सुखाची प्राप्ती झाली.

राणीला तर अपार सुखाची प्राप्ती झाली. परंतु काही दूष्टांना ते सहन झाले नाही. त्यांनी तिच्या पतीकडे राजा माधोसिंहांकडे जो दिल्लीला होता त्यांच्याकडे राणीच्या संदर्भात तक्रार केली की, राजेसाहब! राणी बिघडली. “राणी बिघडली म्हणजे त्यांच्या दृष्टीने तिने भोग ऐैश्वर्याचा त्याग केला. साधू संताच्या सानिध्यात जायला लागली. कथा कीर्तन सत्संग- प्रवचने ऐकायला लागली. म्हणजे राणी बिघडली.

राजाकडे राणीच्या संदर्भात दुर्जनांनी तक्रार केली. राजा थोडा तमोगुणी होता. त्यामुळे राजाने सांगितले की, राणीला समजावून सांगा. परंतु दुर्जन म्हणाले महाराज, ती आता समजावण्याच्या पार पलीकडे गेली आहे. तिला कितीही समजावले तरी ती आता समजून घेणार नाही. त्यामुळे राजाने सांगितले की, ती जर समजून घेणार नसेल कथा-कीर्तन, सत्संग-प्रवचन श्रवण करणे, संताच्या सानिध्यात जाणे बंद करणार नसेल तर तिची हत्या करा, मारून टाका. असा राजाने आदेश दिल्यानंतर काही म्हणाले, महाराज स्त्रियांची हत्या करणे, छळ करणे चांगले नाही. सीतेच्या छळामुळेच रावण कुळाचा

नाश झाला. द्रौपदीच्या छळामुळेच कौरव कुळ लयास गेले. असेही होऊ शकते की, जर प्रजेला हे सर्व कळाले तर राज्यात विद्रोह होऊ शकतो. त्यामुळे विचार विमर्श करून ऐका दुष्टाच्या साह्याने राणीची हत्याही झाली पाहिजे व विद्रोह देखील निर्माण होऊ नये यासाठी एक षडयंत्र म्हणजेच कपट कारस्थान राणीची हत्या करण्यासाठी रचण्यात आले.

षडयंत्र रचल्याप्रमाणे एका पिंजऱ्यात सिंहाला पकडण्यात आल. त्याला भुकेले ठेवण्यात आले. राणी आपल्या महालात पुजापाठात, ध्यानात मग्न असतांना मारेकऱ्यांनी तो सिंहाचा पिंजरा उचलला. महालासमोर आल्यानंतर त्या सिंहाला पिंजऱ्यातून सोडण्यात आले. तो आक्राळविक्राळ सिंह पिंजऱ्यातून सुटल्यानंतर सरळ राणीच्या महालात शिरला. दासीने सिंहाला बघितले व दासी मोठ्या आवाजात ओरडली. राणी साहेब! सिंह आला! सावधान! राणी ध्यानात मग्न असल्यामुळे राणीने ऐकले नरसिंह आला. राणी त्याच अवस्थेत म्हणाली येऊ दे. तो सिंह धावत पळत राणी जवळ गेला आणि त्या सिंहाने आपले मस्तक राणीच्या चरणावर ठेऊन राणीचे दर्शन घेतले. राणीने नरसिंह समजून त्याची पुजा केली. पुजा आटोपली आणि त्या सिंहाने उडी मारली आणि ज्यांनी त्याला पकडून आणले होते त्यांचे नरडे फोडले व त्यांचे रक्त पिऊन तो तृप्त झाला. काहींनी हे दृश्य बघितले व ते सर्व राजाकडे गेले आणि म्हणाले, महाराज जसे आपण सांगितले होते, त्याप्रमाणे षडयंत्र रचले. परंतु परिणाम उलटा झाला. सिंहाने राणीचे दर्शन घेतले व ज्यांनी षडयंत्रात भाग घेतला होता, त्यांची हत्या केली. आता पुढील आदेश काय आहे? राजाने विचार केला की, आता जर का दुसरे षडयंत्र रचले, तर मरणाऱ्यामध्ये पाळी आपलीच पहिली येईल. म्हणून त्याने षडयंत्र रचण्याचा विचार



मनातून काढून टाकला. आता राजा देखील राणीप्रमाणे संताच्या सानिध्यात जायला लागला. राजाराणी जायला लागल्यानंतर मंत्री, प्रधान, सेनापती, प्रजा सर्व जायला लागले **''यथा राजा तथा प्रजा''**

या न्यायाने सर्व भक्ती मार्गाला लागले आणि सर्वांचा उद्धार झाला. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात...

**मज दास करी त्यांचा । संत दासांच्या दासांचा ।।**

किंवा एकनाथ महाराज म्हणतात...

**संताचे संगती होय मोक्ष प्राप्ती ।**

म्हणून आपणास या जगामध्ये सुख आणि मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त करायचा असेल तर त्यासाठी दुर्जनाची संगती टाळून संताच्या सानिध्यात गेले पाहिजे. परंतु संतांचे सानिध्य प्राप्त होणे एवढे सोपे नाही. संताचे सानिध्य प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर त्यासाठी उपाय काय? त्यासाठी भगवान शिव सांगतात.

**गिरीजा संत समागम सम लाभ न कुछ आन ।**
**बिणू हरि कृपा न होई सो गावही बेद पुराण ।।**

हे गिरीजे संत संगती समान या जगात कोणताच मोठा लाभ नाही. परंतु तो भगवंताच्या कृपेशिवाय मिळत नाही. असे वेद पुराण आदि सर्व सांगतात. म्हणून संत मिळण्यासाठी एकनाथ महाराज शेवटच्या चरणामधे भगवंताकडे प्रार्थना करतात...

**एका जनार्दनी हेची सत्य वाचा । नको अभक्ताचा संग देवा ।।**

हे प्रभू ! संताच्या संगतीने जिवंतपणी सुख व मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त होतो व दुर्जनाच्या संगतीने जिवंतपणी दुःख व मृत्यूनंतर नरकाची प्राप्ती होते ही सत्य वाणी आहे. म्हणून आम्हाला '' नको अभक्ताचा संग देवा '' अभक्ताची दुर्जनाची संगती जीवनात देऊ नको. तर काय पाहिजे हे दुसऱ्या एका अभंगामध्ये भगवंताला म्हणतात.

**संत संग देई संत संग देई । आणिक प्रवाही घालू नको ।।**
**संसार मज न करणे सर्वथा । परमार्थ पुरता हाती देई ।।**
**जनार्दनाचा एका करुणा वचनी । करी विनवणी पायापाशी ।।**

अत्यंत करूण वाणीने, दीन वाणीने भगवंताला एकनाथ महाराज विनंती करतात. एक वेळेस नव्हेतर वारंवारं प्रार्थना करतात की हे प्रभो, आम्हाला संताची संगती मिळू दे, संसार मला करायचा नाही संसाराची मला इच्छा नाही. परमार्थ मात्र घडू दे आणि त्यासाठी हे प्रभू आम्हाला संताची संगती दे.

संत कर्ममेळा देखील म्हणतात...

**आणिक वासना नाही दुजी मना । संत चरणी जाणा मस्तक हे ।।**
**घालीन लोटांगण वंदीन चरण । पूर्वा कर्मा होळी होय तेने ।।**
**कर्ममेळा म्हणे ही माझी वासना । पुरवा नारायणा सर्व भावे ।।**

माझ्या मनामध्ये कसलीच वासना नाही, आशा नाही, अपेक्षा नाही फक्त एकच इच्छा आहे वासना आहे ती ही की, मला संताची संगत नेहमी घडली पाहिजे. त्यांच्या चरणावरती मस्तक ठेवण्याचा वारंवार योग आला पाहिजे. जेणे करून माझ्या पूर्व वाईट संचिताची होळी होऊन वाईट संचित जळून जाईल. म्हणून हे नारायणा, मला संताची संगती दे हीच माझी इच्छा आहे, आणि हीच माझी वासना पूर्ण कर. संत तुकाराम महाराज देखील भगवंताकडे प्रार्थना करतात...

**संताची सेवा कैश्यापरी लाहो । नामाचा आठवो कैसा राहे ।।**
**हेची थोर चिंता लागली मनासी । निजता निद्रेसी न लागे डोळा ।।**
**जेवता जेवणी न लागे गोडधड । वाटते कबाड विषय सुख ।।**
**ऐशिया संकटी पाव कृपा निधी । लावी संत पदी प्रेम भावे ।।**

हे कृपा निधी प्रभू माझ्यावर खूप मोठे संकट आलेले आहे ते निवारण करा. संकट हे आहे की, मनामध्ये रात्रंदिवस चिंता लागलेली



आहे त्यामुळे जेवायला जातो तेव्हा जेवण गोड लागत नाही, झोपायला जातो तर झोप येत नाही. या सर्वांचे कारण म्हणजे चिंता. आणि चिंतेचे कारण हे आहे की, मला संतांची सेवा कशी मिळेल आणि रात्रंदिवस तुझे नामस्मरण माझ्या मनात कसे येईल, अशी थोर चिंता लागलेली आहे. त्यामुळे प्रभू कृपा करा आणि अत्यंत प्रेम भावनेने संतपदी मी लागेल, संताची भेट होईल, त्यांची सेवा घडेल अशी कृपा करा.

म्हणून आपण देखील भगवंताकडे प्रार्थना केली पाहिजे आणि भगवंताकडे प्रार्थना करण्यापूर्वी आपल्या मनाला समजावले पाहिजे जसे संत नामदेव महाराज आपल्या मनाला समजावतात ...

**नको नको मना हिंडो दारोदारी । कष्ट झाले भारी वायाविन ।।**
**कल्पना सोडोनी संता संगे राही । सर्व त्यांचे पायी सुख आहे ।।**

हे मनोबा दुर्जनाच्या संगतीत जाऊ नको. त्या ठिकाणी सर्व कष्ट ही कष्ट, दुःख ही दुःख आहे म्हणून सर्व कल्पना सोडून तू संताच्या सानिध्यात राहा. तेथे सर्व प्रकारे जिवंतपणी सुख ही सुख आणि मृत्यूनंतर सद्गती, मोक्ष आहे. कबीर महाराज देखील समजावतात..

**कबीर संगत साधू की जौ भूसी खाय ।**
**खिर खांड भोजन मिले साकट संग न जाय ।।**

जीवन निर्वाह होईल ऐवढे खाण्यासाठी, पिण्यासाठी अन्नपाणी मिळाले किंवा उपाशी राहण्याची पाळी आली तरी संताच्याच सानिध्यात राहा. परंतु दुर्जनाकडून पाचीपक्वानाचे जेवण मिळाले किंवा दुर्जनाने माझ्या खर्चाने तुला जेवू घालतो, दुसऱ्या धारेचीच काय पहिल्या धारेची दारू पाजतो. सरकारमान्य किंवा बिनासरकारमान्य दुकानात नेऊन पाहिजे तेवढी स्वखर्चाने पाजतो, असा कितीही दुर्जनाने आग्रह धरला तरी त्याच्या संगतीत जाऊ नका, तेथे तरफडू नका.

तर काय करा की, संताच्या सानिध्यात जा तेथे राहा. संताचे सानिध्य मिळण्यासाठी भगवान शिवाने गिरीजेला निमित्त करून केलेला उपदेश नेहमी लक्षात ठेवा, भगवान शिव म्हणतात...

**गिरीजा संत समागम सम लाभ न कछू आन ।**
**बिनू हरि कृपा न होई सो गावही बेद पुरान ।।**

भगवंताच्या कृपेशिवाय संत मिळत नाही, मिळाले तर त्यांची ओळख होत नाही, ओळख झालीच तर त्यांच्यावरती श्रद्धा बसत नाही, श्रद्धा बसली तर ती टिकत नाही आणि आपणास त्याच्यापासून काहीही लाभ होत नाही. हे सर्व त्याच वेळेस होते ज्या वेळेस ईश्वराची कृपा होते. म्हणून ईश्वराला प्रार्थना करायला पाहिजे की...

**अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघुनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**



## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन
# पुस्तके, व्ही.सी.डी.

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |